कोरोना 2020/सूचना/आदेश क्र. 17

महाराष्ट्र शासन


जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451

Email : collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि.20/03/2020

---

**अतितात्काळ**

वाचले:-
1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005
2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना 2020/प्र.क्र.58/ आरोग्य 5 दि.13/03/2020
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020
4) साथ रोग अधिनियम 1897

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्‌घातातील अ.क्र.2 कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

करोना विषाणू संदर्भात माहिती प्रसार माध्यमांचे मार्फत नागरीकांपर्यंत पोहचविणेसाठी, जिल्हयाचा मिडीया सेल, नियोजन भवन इमारतीमध्ये स्थापन करण्याचा आहे. त्याअनुषंगाने, मिडीया सेलसाठी जिल्हा नियोजन अधिकारी रायगड यांच्या कार्यालयातील एक दालन, चार टेबल, खुर्च्यासह कक्ष इतर सुविधांसह तात्काळ जागा उपलब्ध करुन देणेंत येत आहे.

उपरोक्त नमुद ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी यांनी तात्काळ मिडीया सेल स्थापन करावा व अहवाल सादर करावा.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी संगणक, प्रिंटर उपलब्ध् करुन देण्यासाठी सहकार्य करावे.

सदर आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 56 तसेच भारतीय दंड संहिता, 1960 चे कलम 188 अन्वये कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad Alibag

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति,

1. जिल्हा नियोजन अधिकारी रायगड यांस तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
2. जिल्हा माहिती अधिकारी रायगड – अलिबाग यांस तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग